CAREERINDIA

ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 8 ]
Total No. of Printed Pages : 8 ]
ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 45 ]
Total No. of Questions : 45 ]

**A**

**CCE RF**
**CCE RR**
**REVISED**

Question Paper Serial No. **21**

ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M**

**Code No. : 08-M**

# ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

# Subject : First Language — MARATHI

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**

**( ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ & ಪುನರಾವರ್ತಿತ ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Regular Fresh & Regular Repeater )**

ದಿನಾಂಕ : 27. 03. 2020 ] [ Date : 27. 03. 2020

ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 09-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 12-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 09-30 A.M. to 12-45 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 ] [ Max. Marks : 100

येथून कापा.

TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER

प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.

## विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तूनिष्ठ प्रकारचे 45 प्रश्न आहेत.
2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परोक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.
3. बहूपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नासाठी दिलेल्या सचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.
5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठो 15 मिनिटेही दिलेली आहेत.

Tear here



www.careerindia.com

CAREERINDIA



I. **पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा :** $6 \times 1 = 6$

1. 'यशोधन' या संधीयुक्त शब्दाचा विग्रह असा होईल

   (अ) यशो + धन (ब) यश + धन

   (क) यशः + धन (ड) यशा + धन.

2. षष्ठी विभक्तीचे प्रत्यय हे आहेत

   (अ) नो (ब) चा, ची, चे

   (क) स, ला, ते (ड) ने, ए, शी.

3. 'नेहमीच्या सवयी जन्मभर जात नाहीत' या आशयाची म्हण

   (अ) गरज सरो वैद्य मरो

   (ब) कोरड्याबरोबर ओलेही जळते

   (क) जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही

   (ड) एक घाव दोन तुकडे.

4. 'साखरभात' हा शब्द या समासाचे उदाहरण आहे

   (अ) द्विगु (ब) अव्ययीभाव

   (क) कर्मधारय (ड) मध्यमपदलोपी.

5. खालीलपैकी शब्दयोगी अव्ययाचा पर्याय हा आहे.

   (अ) तुझ्याबरोबर (ब) मी

   (क) तू (ड) आपण.

6. 'सुकाळ' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द

   (अ) भरपूर (ब) काळ

   (क) दुष्काळ (ड) महाकाली.

www.careerindia.com

CAREERINDIA



II. **पहिल्या दोन पदातील संबंध आळखून तिसऱ्या पदाचा योग्य संबंध लिहा :** 4 × 1 = 4

7. रामाने रावणास मारले : भावे प्रयोग : : लोकांनी चोर पकडला : ...............

8. तो मुलगा खेळत आहे : वर्तमान काळ : : मी निबंध लिहिला असेन : .............

9. दृष्टी असणारा : डोळस : : हरिणाच्या नाभीतील सुगंधी गाठ : .................

10. कोथळा : पोट : : पक्षी : .......................

III. **पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :** 7 × 1 = 7

11. सर्वज्ञ कोणाला म्हटले आहे ?

12. सोंड पाहणाऱ्या अंधाला हत्ती कसा वाटला ?

13. उत्तम कांबळे यांच्या आईचे नाव काय ?

14. 'सुन्या तिच्याही दाही दिशा' कवितेतील स्त्रियां दु:ख कोठे पुरून ठेवतात ?

15. भरदुपारी कुणाची रांग लागते ?

16. विंदा करंदीकरांचे पूर्ण नाव काय ?

17. भुकेलेल्या पोटाना काय वर्ज्य नाही ?

IV. **खालील प्रश्नांची उत्तरे सूचने प्रमाणे लिहा :** 3 × 2 = 6

18. वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

अ) ठाण मांडणे ब) सर्द होणे.

19. अलंकार ओळखुन लक्षणे लिहा.

'क्रीडांगण जणू चंचल सुंदर भाल तुझे हे गडे'

20. गण पाडून वृत्त ओळखा.

'मना सज्जना तू कडेनेच जावे'.

www.careerindia.com

CAREERINDIA



V. **खालील प्रश्नांची उत्तरे दोन तीन वाक्यात लिहा :** 7 × 2 = 14

21. चिंतामण विनायक जोशी यांचा परिचय लिहा.

22. छत्री दुकानदाराला आश्चर्य का वाटले.

23. पुढल्या शिक्षणाला लई खर्च येईल का ? संदर्भासह स्पष्टीकरण द्या.

24. गंगुबाईंना कोणकोणत्या पुरस्कार व उपाधींनी सन्मानित करण्यात आले ?

25. 'बाहेर मिरविशी आत हरिशी वाकडे' याचा अर्थ काय ?

26. कवी केशवकुमार यांचा परिचय लिहा.

27. गुराख्याच्या जीवाची आग का होते ?

VI. **खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा :** 1 × 3 = 3

28. (अ) प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे.

(ब) अति तेथे माती.

VII. **खालील प्रश्नांची उत्तरे पाच सहा वाक्यात लिहा :** 10 × 3 = 30

29. फिरंग्याने श्रीमंताकडे कोणता तह केला ?

30. अनेक संकटांना डॉ. आंबेडकरांनी कशाच्या जोरावर तोंड दिले ?

31. मदर्स युनियन या संस्थेची माहिती लिहा.

32. शिबिर घेण्यासाठी येणारे शिक्षक नाखूष का असत ?

33. गणा तात्यांना धाकट्या मुलाचा राग का येत होता ? स्पष्ट करा.

34. शकुन सांगण्यासाठी ज्ञानेश्वर कावळ्याला कोणत्या गोष्टी देऊ करतात ?

35. श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रुक्मिणी काय करणार आहे ?



www.careerindia.com

CAREERINDIA



36. समाजसेवक कोणते काम करतात असे कवी यशवंत म्हणतात ?

37. पृथ्वीचे प्रेम मिळावे यासाठी कोण कशाप्रकारे याचना करीत आहे ?

38. धरण कवितेतील स्त्रींच्या गरिबीचे वर्णन कसे केले आहे ?

VIII. **खालील प्रश्नांची उत्तरे आठ-दहा वाक्यात लिहा :** 4 × 4 = 16

39. पिंपळ, बांबू, पपया, गुलमोहर या झाडांची वैशिष्ट्ये लिहा.

**किंवा**

'हिरवे सांगाती' या शीर्षकाची यथार्थता पटवून द्या.

40. पतीच्या मृत्युनंतर टिटवं घेऊन जाताना सावित्री बाईंना कोणत्या गोष्टी आठवत होत्या ?

**किंवा**

सावित्रीबाई फुले या खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी होत्या हे स्पष्ट करा.

41. 'सत्कार' कवितेचे रसग्रहण तुमच्या शब्दात करा.

42. पुढील कवितेच्या ओळी पूर्ण करा :

नांदोत सुखे ..................................

...............................................

...............................................

.............................. समुदाय प्रार्थना

**किंवा**

जातिभाव विसरुनिया ........................

...............................................

...............................................

................................ भीती बावरी.

www.careerindia.com

CAREERINDIA



IX. **पुढे दिलेला उतारा वाचून त्याखालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दा लिहा :** 2 × 2 = 4

43. ''जो आवडतो सर्वांना तोची आवडे देवाला'' ह्या शब्दातच खऱ्या ईश्वर पूजनाचे रहस्य सांगितले आहे. दीन-दुबळ्यांची, अनाथ, अपंगाची सेवा हीच खरी इश्वरपूजा आहे. माणुसकी हा धर्म आहे. जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा. आपण ईश्वराला मंदिरात, वन-उद्यानात शोधतो, पण तो दीन दलितांची करुणाभरी व्यथा बनून दुःखितांच्या द्वारी आपल्यासाठी तिष्ठत असतो. आपण दगडाच्या देवाला पंचपक्वान्नांचा नैवेद्य दाखवितो पण भुकेलेले जीव घासभर अन्नासाठी तळमळत असतात. भुकेलेल्यांच्या ओठी घातलेला घासच ईश्वराप्रत पोचतो. दीन दुःखितांचे अश्रु पुसले, रोगग्रस्तांची सेवा केली, तर ती खरी ईश्वरसेवा घडेल, भव्य मंदिर उभारण्यापेक्षा शाळेसाठी इमारत बांधून, गरजु व गरीब विद्यार्थ्यांच्या विनामूल्य शिक्षणाची सोय करावी, एखादे हॉस्पिटल उभारून गरिबांच्या औषधोपचारांची सोय केली तर ते महान पुण्यकृत्य ठरेल.

**प्रश्न :**

अ) खरी ईश्वरपूजा कोणती ?

ब) महान पुण्यकृत्य कोणते ?

X. **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा :** 1 × 5 = 5

44. पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व पटवून देणारे पत्र तुमच्या मित्राला लिहा.

**किंवा**

गावात होणारा अनियमित वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी अधिकाऱ्याला तक्रार अर्ज लिहा.



www.careerindia.com

CAREERINDIA



XI. **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा :** $1 \times 5 = 5$

45. संगणक काळाची गरज.

**किंवा**

पूरग्रस्ताचे मनोगत.

www.careerindia.com

www.careerindia.com